स्थायी समिती

दाखल विषय – दि. १४/७/२०२०

विषय क्रमांक :– २९६ त्वर्य

कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत साबण व फ्लोअर क्लिनर पुरविणे मागविण्यात आल्या असता निविदाधारक मे.अंजनी असो. यांचेकडून रक्कम रुपये - 35,11,945 -/( अक्षरी रक्कम रुपये - पस्तीस लक्ष अकरा हजार नऊशे पंचेचाळीस मात्र ( पर्यंत करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१५९ दि.९/७/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– २९७ त्वर्य

कोविड महिन्याची सवलत देण्यात २ च्या संसर्गजन्य रोगामुळे मिळकत कर बिलामध्ये १९- यावी,जप्तीच्या नोटीसा बजावू नये २ मिळकत कर न भरल्यास महिना ,% दंड आकारू नये बाबत मा.वसंत मोरे यांचे दि.१४/५/२०२० चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३८ दि. १९/५/२०२० वर मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/कर.आ.कर.संक./१६० दि. ९/७/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

विषय क्रमांक :– २९८ त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७,(३)(क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उदभवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये पुणे शहरातील नायडु सांसर्गिक रुग्णालय येथे लॉन्ड्री मशिन मे मेकर्स अॅण्ड मर्चंटस्, पत्ता फरिदाबाद, हरियाना, १२१००३ यांचेकडून खरेदी करुन त्यांना त्या मोबदल्यापोटी र.रु. ३,७२,८८०/– चे बिल अदा केले असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१६२ दि. ९/७/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– २९९ त्वर्य

डॉ.नायडू सांसर्गिक रोग रूग्णालय व कोव्हिड केअर सेंटरसाठी लागणा–या ऑक्सिजन जम्बो सिलेंडर, ऑक्सिजन सिलेंडर १०.२ मेडिकल ग्रेड,ऑक्सिजन रेग्युलेटर,स्पॅनर,टयुबिंग विथ मास्क,व सिलेंडर ट्रॉली इ. इ. ॲटम्सची खरेदी करणेकरीता कोटेशन मागविले असता आलेल्या पाच कोटेशनपैकी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पाच ॲटम्सची क्वॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि. यांचेकडून रक्कम रूपये १७,४२,२७५/– आणि अंशुष इनोव्हेटिव्ह क्रियेशन्स यांचेकडून रक्कम रूपये ७,४९,५७५/– जीएसटी करासह एकुण रक्कम रूपये २४,९१,८५०/– (अक्षरी रक्कम रूपये चोवीस लाख एक्यानव हजार आठशे पन्नास फक्त ) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये खरेदी करण्यात येणार असून त्यांचेकडून आवश्यक तो करारनामा करण्यात येणार असल्याने सदरच्या बाबीस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१६५ दि.१४/७/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ३०० त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने,रूग्णालये व प्रसुतिगृहांसाठी श्वानदंश लस खरेदी करणे ( टेंडर क्रमांक ७ सन २०२०–२१ ) कामी निविदा मागविण्यात आली असता आलेल्या एकुण तीन निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक लक्ष्मी मेडिकल्स यांचेकडून खात्याच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार प्रति व्हायल्स रक्कम रूपये २९४/– ( जीएसटी करासहित ) प्रमाणे Inj. Anti Rabies Vaccine 0.5 ml / 1 ml इंजेक्शन रक्कम रूपये ७२,००,०००/– (अक्षरी रक्कम रूपये बाहत्तर लाख फक्त ) पर्यंत खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१६६ दि.१४/७/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०–२१ RE17F195 श्वानदंशावरील लस व ईमिनोग्लोबिन खरेदी करणे.

मान्य तरतूद रक्कम रूपये ७२,००,०००/– पैकी रक्कम रूपये ७२,००,०००/-

**विषय क्रमांक :– ३०१ त्वर्य**

मा.सौ.वर्षा तापकीर व मा.प्रमोद ओसवाल यांचे दि. १४/७/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. ४४ दि. १६/४/२०२० चा फेरविचार करण्यात यावा. (मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.गटनेते, भारतीय राष्ट्रिय काँग्रेस पक्ष,मा.गटनेते, शिवसेना, मा.गटनेते, म.न.से. तसेच मा.स्थायी समिती सभा व विशेष समिती सभाप्रसंगी चहापान व खाद्यपदार्थ यांची बिले अदा करणेस सन २०१९–२०२० चे अंदाजपत्रकावर बिले खर्ची करणेस मान्यता मिळाली असून कोविड–१९ च्या प्रार्दुभावामुळे सदरची बिले सन २०१९–२०२० चे अंदाजपत्रकावर खर्ची टाकणेस शक्य झाले नसल्याने सदरची बिले सन २०२०–२०२१ च्या अंदाजपत्रकातील १–मुख्यदेखरेख वसुली वगैरे, क–म.न.पा.नि स्थायी समिती, १–नगरसचिव यांचे कार्यालय, ३.मागील बिले देण्यासाठी (RE11A103A) या अर्थशिर्षकावर अदा करणेस मान्यता देण्यात यावी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**